

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



१ जुलै,२०२४ ते ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत "सफाई अपनाओ बिमारी भगाओ" अभियान

Volume III Issue 19 Date 11-07-2024

भारतातील चीनचे राजदूत एच.ई. झू फेहाँग व मुंबईतील चिनी महावाणिज्य दूत कॉग झिंयान हुआ यांची सोलापूर भेट...

डॉ.कोटणीस यांना केले मनोभावे अभिवादन....

कॅम्प प्रशालातील विद्यार्थ्यांशी साधला संवाद...

डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी दुसऱ्या जागतिक महायुद्धात जपानी आक्रमणावेळी चीनमध्ये येऊन केलेल्या लष्करी रुग्णसेवेचा आम्हाला अभिमान आहे व त्या सेवेकरीता चीन शासन सदैव डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या ऋणात राहील असे प्रतिपादन चीनचे राजदूत एच.ई. झू फेहाँग यांनी सोलापूर शहरातील डॉ.द्वारकानाथ कोटणीस स्मारक भेटी प्रसंगी केले.

चीनचे भारतातील राजदूत एच.ई. झू फेहाँग व मुंबईतील चिनी महावाणिज्य दूत कॉग झिंयान हुआ यांच्यासह शिष्टमंडळाने बुधवारी सकाळी 8:00 वाजता साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील डॉ.द्वारकानाथ कोटणीस स्मारकास भेट दिली. यावेळी महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले त्यानंतर चीनचे भारतातील राजदूत एच.ई. झू फेहाँग व मुंबईतील चिनी महावाणिज्य दूत कॉग झिंयान हुआ यांनी द्वारकानाथ कोटणीस यांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांच्या बद्दल व त्यांच्या स्मारकासंदर्भात राजदूत एच.ई. झू फेहाँग यांना माहिती दिली. चीनचे भारतातील राजदूत एच.ई. झू फेहाँग यांनी स्मारकातील म्युझियममधील सर्व छायाचित्रे पाहिली.तसेच चीनचे जनरल माओ स्ते यांनी त्यावेळी पाठविलेले कृतज्ञता संदेश पत्राचे अवलोकन केले व सोलापूर महानगरपालिकेतर्फे जतन केलेल्या स्मारकाबाबत कृतज्ञता व्यक्त करून स्मारकाबद्दल समाधान व्यक्त केले.

त्यानंतर महापालिकेचे कॅम्प प्रशाला येथे सदिच्छा भेट देत चीनचे भारतातील राजदूत एच.ई. झू फेहाँग यांनी विद्यार्थ्यांशी संवाद डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या बलिदानाला स्मरणात ठेवून सर्व विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधावी असे आवाहन केले तसेच शाळेच्या विकासासाठी पुढे येऊन डॉ. द्वारकानाथ कोटणीस सारखे महान विद्यार्थी घडवण्यासाठी आणि सर्व शाळा डिजिटल करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करू असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे,उपायुक्त तैमुर मुलाणी ,सहाय्यक आयुक्त ज्योती भगत पाटील, सहायक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले,नगर अभियंता सारिका अकुलवार, प्रशासन अधिकारी संजय जावीर, उपअभियंता किशोर सातपुते, भगवान मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.त्यानंतर श्री. एच.ई. झू फीहॉन्ग, भारतातील चीनचे राजदूत मा. श्री. कॉग झियाउहा, कौन्सिल जनरल व त्यांच्या शिष्टमंडळी यांनी महापालिकेच्या इंद्रभवन इमारतीला भेट दिली. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांनी इंद्रभवना संदर्भातील सर्व माहिती त्यांना दिली.

